विभागीय आयुक्त यांना अधिकार प्रदान करणे
जिल्हा परिषदांतील बंधपत्रित आरोग्य सेविका
ए.एन.एम यांच्या सेवा नियमित करणेबाबत
शासन निर्णयाचे.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः डिईएन-२०१८/प्र.क्र.३९/आस्था-१२
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४००००१.
दिनांक :- २८ मे, २०१९

वाचा-

शासन निर्णय क्रमांक:- शासन निर्णय क्र.डीईएन-२०१८/प्र.क्र.३९/आस्था-१२, दि.५ मे, २०१८

शुध्दीपत्रक :--

शासनाच्या समक्रमांकाच्या दि.५ मे, २०१८ च्या शासन निर्णयातील पहिल्या परिच्छेदात खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले होते.

" मा. सर्वोच्च न्यायालयाने अपील (सिव्हील) ३५९५-३६१२, उमादेवी व इतर विरुध्द कर्नाटका शासन या प्रकरणात दि.१० एप्रिल, २००६ रोजी दिलेला शासन निर्णय विचारात घेऊन तसेच सामान्य प्रशासन विभागाने या न्यायालयीन निर्णयानुसार तात्पुरत्या/ स्थायी स्वरुपात केलेल्या नियुक्त्या या नियमित करता येणार नाहीत असे स्पष्ट केलेले आहे. शिवाय अशा तात्पुरत्या /अस्थायी स्वरुपात नेमूणका केलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांना नियमित सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नसल्याचे स्पष्ट करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत."

त्या ऐवजी पुढीलप्रमाणे वाचण्यात यावे.

" मा. सर्वोच्च न्यायालयाने अपील (सिव्हील) ३५९५-३६१२, उमादेवी व इतर विरुध्द कर्नाटका शासन या प्रकरणात दि.१० एप्रिल, २००६ रोजी दिलेला निर्णय विचारात घेऊन तसेच सामान्य प्रशासन विभागाने या न्यायालयीन निर्णयानुसार तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपात केलेल्या नियुक्त्या या

नियमित करता येणार नाहीत असे स्पष्ट केलेले आहे. शिवाय अशा तात्पुरत्या /अस्थायी स्वरुपात नेमूणका केलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांना नियमित सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नसल्याचे स्पष्ट करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत."

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५२८११०२३७५९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Ravindra Ishwar Giri
Date: 2019.05.28 16:31:32 +05'30'

(र. ई. गिरी)
अवर सचिव, महाराष्ट्र राज्य

प्रति,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
३. निवड नस्ती (आस्था-१२)